जाक्र.साप्रवि/आस्था-२(५)/भरती/३८०/२०१४
सामान्य प्रशासन,जिल्हा परिषद सातारा
दिनांक- २२/०८/२०१४

# जिल्हा निवड समिती सातारा
## जिल्हा परिषद साताराकडील वर्ग-३ मधील सरळसेवा भरती जाहिरात सन २०१४

(शासन पत्र क्रमांक एपिटी-२०१४/प्र.क्र.४८/आस्था-८ दि. १२.०८.२०१४ नुसार)

जिल्हा परिषद सातारा अंतर्गत विविध विभागातील खालील नमुद केलेल्या (जिल्हा सेवा तांत्रिक/ अतांत्रिक,वर्ग-३) संवर्गातील मागासवर्गीयांचा अनुशेष, व सरळसेवेतील रिक्त पदांच्या भरतीसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ नुसार पात्र उमेदवाराकडुन (लेखी) परिक्षेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ क्र | पदांचे नांव | वेतन बँड व ग्रेड पे | एकुण पदाची संख्या | प्रवर्ग निहाय तपशील | पैकी समांतर आरक्षण | | | | | | समांतर आरक्षणा शिवाय | अपंग राखीव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **महिला ३० %** | **माजी सैनिक १५%** | **प्रकल्प ग्रस्त ५%** | **भुकंप ग्रस्त २%** | **खेळाडू ५%** | **अंश कालीन १०%** | | |
| १. | विस्तार अधिकारी (कृषी) | र.रु ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | ०१ | खुला-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| २. | जोडारी | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | ०१ | खुला-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| ३. | कनिष्ठ यांत्रिकी | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.१९०० | ०१ | खुला-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| ४. | औषध निर्माण अधिकारी | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२८०० | १० | शै.सा.मा.प्र.(इए सबीसी)-०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | विमाप्र-अ (एस बीसी -ए)-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | खुला-०७ | ०२ | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०३ | |
| ५. | आरोग्य सेवक पुरुष ५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारीमधुन | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२४०० | ११ | अनुसूचित जाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | अनुसूचित जमाती-०४ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०३ | -- |
| | | | | इतरमागास वर्ग-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | शै.सा.मा.प्र.(इए सबीसी)-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | खुला-०४ | -- | ०१ | -- | -- | -- | -- | ०३ | -- |
| ६. | आरोग्य सेवक पुरुष ४० टक्के | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२४०० | १३ | अनुसूचित जाती-०६ | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०४ | -- |
| | | | | अनुसूचित जमाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | भटक्या जमाती क-०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | -- |
| | | | | भटक्या जमाती ड-०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | -- |
| | | | | विशेषमागास प्रवर्ग-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | इतरमागासवर्ग-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| ७. | आरोग्य सेवक महिला | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२४०० | ३३ | अनुसूचित जाती-०५ | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०३ | ०१ पद ( अल्पदृष्टी किंवा कर्णबधीर ) |
| | | | | विमुक्त जाती अ-०३ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ | |
| | | | | भटक्या जमाती क-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | भटक्या जमाती ड-०३ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०३ | |
| | | | | विशेषमागास प्रवर्ग-०६ | -- | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०४ | |
| | | | | शै.सा.मा.प्र.(इए सबीसी)-०२ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०२ | |
| | | | | विमाप्र-अ (एस बीसी -ए)-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | खुला-१२ | -- | ०२ | ०१ | -- | ०१ | ०१ | ०७ | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | कनिष्ठ आरेखक | ५२००-२०२०० ग्रेडपे २४०० | ०२ | अनु.जमाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | खुला-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| ९. | कंत्राटी ग्रामसेवक | एकत्रित मानधन रु. ६०००/- | २१ | अनुसूचित जाती-०४ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ | |
| | | | | अनुसूचित जमाती-०७ | ०२ | ०२ | -- | -- | -- | ०१ | ०२ | |
| | | | | भटक्या जमाती ड-०३ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०२ | |
| | | | | शै.सा.मा.प्र.(इए सबीसी)-०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | विमाप्र-अ (एस बीसी -ए)-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | खुला-०४ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ | |
| १०. | आरोग्य पर्यवेक्षक | र.रु ९३००-३४८०० ग्रे.पे.४२०० | ०१ | अनुसूचित जमाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| ११. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२४०० | २७ | अनुसूचित जाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ पद कर्णबधीर |
| | | | | अनुसूचित जमाती-०५ | ०२ | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०१ | |
| | | | | शै.सा.मा.प्र.(इए सबीसी)-०४ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ | |
| | | | | विमाप्र-अ (एस बीसी -ए)-०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | खुला-१५ | ०५ | ०३ | ०१ | -- | ०१ | ०२ | ०३ | |
| १२. | वरिष्ठ सहाय्यक लिपीक | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२४०० | ०२ | भटक्या जमाती ड-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | इतरमागासवर्ग -०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| १३. | पशुधन पर्यवेक्षक | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.२४०० | १२ | अनुसूचित जाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | अनुसूचित जमाती-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | विमुक्त जाती अ-०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | भटक्या जमाती ब-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | इतरमागास वर्ग-०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | शै.सा.मा.प्र.(इए सबीसी)-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | |
| | | | | खुला-०४ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ | -- |
| १४. | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | र.रु ५२००-२०२०० ग्रे.पे.१९०० | ०२ | अनुसूचित जाती -०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| | | | | इतरमागासवर्ग-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |
| १५. | परिचर -वर्ग-४ | र.रु.४४४०-७४४० ग्रे.पे.१३०० | १० | अनु.जमाती-०४ | ०१ | ०१ | -- | -- | -- | -- | ०२ | -- |
| | | | | भटक्या जमाती क-५ | ०२ | ०१ | -- | -- | -- | ०१ | ०१ | -- |
| | | | | विमाप्र-अ (एस बीसी –ए)-०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | -- |

## उपरोक्त पदांसाठी शैक्षणिक अर्हता –

| अ क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | विस्तार अधिकारी (कृषी) | सांविधीक विद्यापीठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण करीत असतील तसेच बी टेक (ॲग्री इंजिनिअरिंग) ही कृषि विषयाची पदवी धारण करीत असेल अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. परंतु ज्यांनी कृषि कामाची उच्च शैक्षणिक अर्हता व कृषि कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारीत कृषिचा, ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असेल त्यांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २. | जोडारी | चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले असतील व ज्यांना जोडा-यांच्या कामाचा कि मान दोन वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असेल, शासकीय तंत्र शाळेतून विहित केलेला जोडा-याचा पाठयक्रम किंवा तुल्य पाठयक्रम उत्तीर्ण झाले असतील. |
| ३. | कनिष्ठ यांत्रिकी | ज्यांनी तांत्रिक शिक्षण विभागाच्या यांत्रिकी विषयातील अल्प मुदतीचा पाठयक्रम पूर्ण केला असेले किं वा जे समतुल्य अर्हता धारण करीत असतील आणि रुळ मार्ग किंवा वाफेचे व तेलाचे रोड रोलर किं वा तत्सम गोष्टींच्या दुरुस्तीचा ज्यांना किमान ५ वर्षाचा अनुभव असेल असे उमेदवार |
| ४. | औषध निर्माण अधिकारी | औषधशाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते |

| | | |
|---|---|---|
| ५. | आरोग्य सेवक पुरुष ५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारीमधुन | जे विज्ञान या विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण आहेत व राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून नव्वद दिवसांचे अनुभवाचे प्रमाणपत्र बेधनकारक राहील. |
| ६. | आरोग्य सेवक पुरुष ४० टक्के | जे विज्ञान विषयासह माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण आहेत परंतु राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून नव्वद दिवसांचा अनुभव धारकांना प्राधान्य देण्यांत येईल. |
| ७.. | आरोग्य सेवक महिला | १) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसेल आणि २) ज्यांची अर्हता प्राप्त साहयकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किं वा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. |
| ८. | कनिष्ठ आरेखक | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील आणि ज्यांनी शासनाने मान्यता दिलेला स्थापत्य आरेखकचा पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला असेल. |
| ९. | कंत्राटी ग्रामसेवक | किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता परिक्षेत किमान ६० % गुणासह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदवीका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम)किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यू.)किं वा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उतीर्ण व कृषि पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण किंवा कृषि पदवीधर, कृषि पदव्युत्तर पदवीधारक /बी.टेक (अॅग्रो इंजिनिअरिंग) किंवा यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठाची कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदवीका/फळबागा उत्पादन पदविका/भाजीपाला उत्पादन पदविका/फुलशेती व प्रांगण उदयान पदवीका दोन वर्षे आणि बी.एस.सी (कृषि/उदयानविदया) सहा वर्षे आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेली परिक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| १०.. | आरोग्य पर्यवेक्षक | ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठांची विज्ञान शाखेतील पदवी धारण केलेली असेल, आणि<br>ज्यांनी बहुउद्देशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठयाक्रम यशस्वीरित्या पुर्ण केलेला असेल अशा उमेदवारांमधून नाम निर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| ११. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ज्या व्यक्तीने शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि जी व्यक्ती शासनाच्या तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण किं वा वास्तूशास्त्रिय आरेखक किं वा बांधकाम पर्यवेक्षक किंवा आरेखक स्थापत्य पाठयक्रम उत्तीर्ण. सैनिक सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवायझर पदावरील या शाखेतील अनुभवाचे आधारे दिलेले प्रमाणपत्र (NCTVT/NAC) |
| १२. | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | संविधिमान्य विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. |
| १३. | पशुधन पर्यवेक्षक | “जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पशुसंवर्धन संचालनालयाने चालविलेल्या किं वा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषी विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परीक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषी विद्यापीठामार्फत चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला २ वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्यामार्फत चालविण्यात येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा वैधानिक विद्यापीठामधील पशुवैद्यकिय शास्त्रातील पदवी धारण करीत असतील असे उमेदवार. |
| १४. | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचा-यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल.परंतु असे की, उक्त दोन भाषापैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार, नियुक्त केलेल्या तारखेपासुन दोन वर्षाच्या कालावधीत दुस-या भाषेतील दर मिनिटास ३० शब्दाहून कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील असे वेगाचे प्रमाणपत्र प्राप्त न केल्यास राज्य शासन त्या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवील अशा कार्यवाहीस ते पात्र ठरतील.परंतु आणखी असे की, इंग्रजी विषय घेवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. **टंकलेखन परिक्षेसाठी** संगणक टंकलेखन अभ्यासक्रमामधील **१**. बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/ हिंदी ३० श.प्र.मि.(६ महिने) **२**. बेसिक कोर्स इन कॉम्प्युटर टायपिंग मराठी/इंग्रजी/ हिंदी ४० श.प्र.मि.(६ महिने) **३**. स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग फॉर इन्स्ट्रक्टर्स अँड स्टुडंटस (३ महिने) हे तिन्ही कोर्स सदर पदासाठी पात्र ठरविण्यात आलेले आहेत. |
| १५. | परिचर-वर्ग ४ | मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. |

## लेखी परीक्षेचे वेळापत्रक

| अक्र | पदनाम | लेखी परिक्षा दिनांक | परिक्षा वेळ | लेखी परिक्षेचे गुण | | | | | एकुण | | प्रश्नपत्रि-केचा दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मराठी | इंग्रजी | सामान्य ज्ञान | बुध्दि मापन व गणित | तांत्रिक | प्रश्न | एकूण | |
| १. | विस्तार अधिकारी (कृषी) | **०२/११/ २०१४** | **१० ते ११.३०** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | **१००** | **२००** | **मराठी १२ वी दर्जा,कृषी संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा** |
| २. | जोडारी | **०२/११/ २०१४** | **२ ते ३.००** | -- | -- | -- | -- | ५० | **५०** | **१००** | **आयटीआय दर्जाचे प्रश्न** |
| ३. | कनिष्ठ यांत्रिकी | | | -- | -- | -- | -- | ५० | **५०** | **१००** | **आयटीआय दर्जाचे प्रश्न** |
| ४. | औषध निर्माण अधिकारी | **०८/११/ २०१४** | **१०.०० ते ११.३०** | १५ | १५ | १५ | १५ | ४० | **१००** | **२००** | **सर्व विषय एसएससी दर्जाची परिक्षा व औषध शास्त्र संबंधी प्रश्न** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | आरोग्य सेवक पुरुष ५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारीमधुन | ०८/११/ २०१४ | २ ते ३.३० | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | सर्व एसएससी दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| ६. | आरोग्य सेवक पुरुष ४० टक्के | | | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | सर्व एसएससी दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| ७. | आरोग्य सेवक महिला | | | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | एसएससी दर्जाची परिक्षा व आरोग्य सेवा विषयक प्रश्न |
| ८. | कनिष्ठ आरेखक | | | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | सर्व विषय एसएससी दर्जाची परिक्षा व आरेखकसंबंधी प्रश्न |
| ९. | कंत्राटी ग्रामसेवक | ०९/११/ २०१४ | १० ते ११.३० | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | सर्व विषय एसएससी दर्जाची परिक्षा व कृषि पदविका दर्जाचे प्रश्न |
| १०. | आरोग्य पर्यवेक्षक | | | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा,विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदवी दर्जाची परिक्षा |
| ११. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ०९/११/ २०१४ | २ ते ३.३० | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | एसएससी दर्जाची परिक्षा व तांत्रिक प्रश्न |
| १२. | वरिष्ठ सहाय्यक लिपीक | १६/११/ २०१४ | १० ते ११.३० | २५ | २५ | २५ | २५ | -- | १०० | २०० | मराठी १२ वी व इतर पदवी दर्जाची परीक्षा |
| १३. | पशुधन पर्यवेक्षक | | | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | मराठी १२ वी दर्जा विज्ञान व आरोग्य संबंधी प्रश्न पदविका दर्जाची परिक्षा |
| १४. | कनिष्ठ सहाय्यक लेखा | १६/११/ २०१४ | २ ते ३.३० | २५ | २५ | २५ | २५ | -- | १०० | २०० | सर्व विषय एसएससी दर्जाची परिक्षा |
| १५. | परिचर-वर्ग४ | २२/११/ २०१४ | २ ते ३.३० | २० | -- | २० | १० | -- | ५० | १०० | इयत्ता चौथी दर्जा. |

## अर्ज सादर करणेचा तपशिल

| क्र | पदाचे नांव | अर्ज कोणाचे नांवे करावयाचा | अर्ज करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | विस्तार अधिकारी (कृषि) | सदस्य सचिव, तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | **कृषि विभाग, तिसरा मजला जिल्हा परिषद सातारा** |
| २. | जोडारी | सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सातारा | **बांधकाम उत्तर विभाग, पहिला मजला जिल्हा परिषद सातारा** |
| ३. | कनिष्ठ यांत्रिकी | | |
| ४. | औषध निर्माण अधिकारी | सदस्य सचिव, तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | **आरोग्य विभाग, पहिला मजला जिल्हा परिषद सातारा** |
| ५. | आरोग्य सेवक पुरुष ५० टक्के हंगामी फवारणी कर्मचारीमधुन | | |
| ६. | आरोग्य सेवक पुरुष ४० टक्के | | |
| ७. | आरोग्य सेवक महिला | | |
| ८. | कनिष्ठ आरेखक | सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सातारा | **बांधकाम उत्तर विभाग, पहिला मजला जिल्हा परिषद सातारा** |
| ९. | कंत्राटी ग्रामसेवक | सदस्य सचिव, तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद सातारा | **ग्रामपंचायत विभाग, चौथा मजला जिल्हा परिषद सातारा** |
| १०. | आरोग्य पर्यवेक्षक | सदस्य सचिव, तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | **आरोग्य विभाग, पहिला मजला जिल्हा परिषद सातारा** |
| ११. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | सदस्य सचिव, तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सातारा | **बांधकाम उत्तर विभाग, पहिला मजला जिल्हा परिषद सातारा** |
| १२. | वरिष्ठ सहाय्यक लिपीक | सदस्य सचिव, तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र), जिल्हा परिषद सातारा | **सामान्य प्रशासन विभाग, चौथा मजला, जिल्हा परिषद सातारा** |
| १३. | पशुधन पर्यवेक्षक | सदस्य सचिव, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | **पशुसंवर्धन विभाग, तिसरा मजला जिल्हा परिषद सातारा** |
| १४. | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | सदस्य सचिव, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा | **अर्थ विभाग, दुसरा मजला जिल्हा परिषद सातारा** |
| १५. | परिचर-वर्ग ४ | सदस्य सचिव, तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र), जिल्हा परिषद सातारा | **सामान्य प्रशासन विभाग, चौथा मजला, जिल्हा परिषद सातारा** |

**अर्ज स्विकारणेचा कालावधी :-** सर्व पदांसाठी दिनांक २३/०८/२०१४ ते ०६/०९/२०१४ या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळुन) सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ या वेळेत अर्ज स्विकारले जातील. पोष्टाव्दारे प्राप्त होणारे अर्ज दिनांक ०६/०९/२०१४ रोजी सायंकाळी ५.४५ पर्यंत प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरले जातील.

## उमेदवारांसाठी सूचना

**भरावायाच्या पदांचे तपशिलामध्ये समांतर आरक्षणाशिवाय या कॉलममधील पदे त्या त्या प्रवर्गातील समांतर आरक्षण वगळून शिल्लक राहिलेली पदे दर्शविलेली आहेत.**

१. **माजी सैनिक वगळता, समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस सदर पदे सामाजिक आरक्षणातील पात्र उमेदवारामुधन भरण्यांत येतील.**

२. **वयोमर्यादा-** सर्व पदांसाठी वयाची अट ही किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे राहील. अपंग/माजी सैनिक/स्वातंत्य सैनिकांचे पाल्य/ सन १९९१ चे जनगणना कर्मचारी/ सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी तसेच नियमित पदावरील जिल्हा परिषद कर्मचारी यांचेसाठी वयोमर्यादा ४५ वर्ष व अंशकालीन साठी ४६ वर्ष राहील. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील

सुट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे राहील. स्थापत्य अभियांत्रिकी पदासाठी ज्यांनी १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवाराच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा ४७ वर्षे इतकी शिथिल करता येईल.उमेदवारांचे वयाची किमान व कमाल मर्यादा ही अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच दिनांक ०६/०९/२०१४ अखेर ग्राहय धरणेत येईल.

३. **जाहिरातीतील पदांच्या संख्येमध्ये कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. ग्राम विकास विभाग मुंबई यांचेकडील दिनांक ५ जुलै २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गट क व गट ड पदासाठी लेखी परिक्षा घेवुन, लेखी परिक्षेच्या गुणवत्तेनुसार निवड करणेच्या असल्याने, कोणत्याही पदांसाठी तोंडी मुलाखती नाहीत.** परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हास्तरीय निवड समिति सातारा हे स्वतःकडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

४. **परिक्षा शुल्क (फी)- खुला प्रवर्गासाठी रु. १५०/- व राखीव प्रवर्गासाठी रु. ७५/- असे परिक्षा शुल्क राहील. तसेच** विहीत परिक्षा शुल्काप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा व सातारा येथे देय असलेल्या रेखांकित डीमांड ड्राफ्ट (धनाकर्ष) हा **मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सातारा** (Chief Accounts & Finance Officer,Z.P.Satara) यांचे नावे काढून परिपुर्ण अर्जासोबत जोडणेचा आहे. डी डी च्या मागे अर्जदारांने संपूर्ण नाव व पत्ता लिहणेचा आहे. परिक्षा शुल्क हे नापरतावा राहील. **( माजी सैनिकांना परिक्षा शुल्क लागू नाही ) अर्जासोबत परिक्षा शुल्क डीमांड ड्राप्ट न जोडलेस अर्ज अपात्र केला जाईल.**

५. **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे** - उमेदवार एका पेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करणार असलेस प्रत्येक पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणेचा आहे व अर्जासोबत पदासाठी विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रते प्रमाणे कागदपत्रे, वयाचा पुरावा, डोमेसाईल प्रमाणपत्र, नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र, अपंगत्वाचा दाखला तसेच समांतर आरक्षणातून अर्ज करतांना माजी सैनिकांचे प्रमाणपत्र, स्वातंत्र्य सैनिक पाल्य प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्त प्रमाणपत्र, अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू प्रमाणपत्र इ. प्रमाणपत्राच्या सत्य प्रती जोडणेच्या आहेत. मागासवर्गीय प्रवर्गातील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र अथवा जातीचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अर्ज दाखल केलेवर त्या नंतर कोणतीही जादा कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

६. शासकिय निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकारणाच्या परवानगीने भरणेचा आहे. व अशा परवानगीची प्रत अर्जा सोबत जोडावयाची आहे.

७. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत सादर करणेच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधिन राहून नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती दिलेवर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा पडताळणी समितीकडे सादर केलेची पाहोच कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

८. उमेदवारांना संबंधित पदासाठी करावयाच्या अर्जाचा विहित नमुना व लेखी परिक्षा प्रवेशपत्राचा नमुना सातारा जिल्हा परिषदेच्या **www.zpsatara.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेला आहे.

९. **आरोग्य सेवक (पुरुष)(हंगामी फवारणी कर्मचारी यांचेमधुन) ५० टक्के पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी जिल्हा हिवताप अधिकारी यांचा फवारणी कर्मचारी म्हणून ९० (नव्वद) दिवस काम केलेबाबत अनुभव दाखला जोडणे आवश्यक आहे. अर्जासोबत अनुभव दाखला नसलेस अर्ज अपात्र ठरविणेत येईल. तसेच आरोग्य सेवक (पुरुष)(हंगामी फवारणी कर्मचारी यांचेमधुन) ५० टक्के फवारणी कर्मचा-यांच्याबाबतीत मा.उच्च न्यायालयाची रिट याचिका क्र. ६२१५/२००९, ५५६८/२००९ व ५९५८/२००९ अन्व येच्या सुचनांप्रमाणे वयोमर्यादेबाबतीत कार्यवाही केली जाईल.**

१०. उमेदावारांस मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

११. अ) शासन निर्णय क्रमांक.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दिनांक २७ जुन २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे डोमिसाईल प्रमाणपत्र उपलब्ध नसलेस त्यांने त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात डोमिसाईल प्रमाणपत्राची अट लागु राहणार नाही.
ब) सदर उमेदवारांकडे जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवारांनी शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद आवश्यक राहील.
क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागु राहील.

१२. सेवा योजन कार्यालय, आदिवासी प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अंशकालीन कर्मचारी या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार जाहिरातीप्रमाणे फी भरुन विहित पदासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे.

१३. उमेदवारांने अर्जावर नमुद केलेल्या सुचना काळजीपुर्वक वाचुन अर्ज विहीत नमुन्यात परिपुर्ण भरण्याचा आहे. अर्जावर उजव्या बाजुस आयडेंटी साईज फोटो लावुन तो राजपत्रित अधिकारी किंवा पोष्ट मास्तर, मुख्याध्यापक, व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकारी यांच्याकडून सांक्षाकीत करावा. अर्ज हे संबंधित विभागप्रमुख/सदस्य-सचिव यांच्या कार्यालयामध्ये समक्ष स्विकारले जातील. पोष्टाव्दारे अर्ज पाठवितांना पाकीटावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे, त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करुन अर्ज पाठवावेत. पोष्टाव्दारे पाठविलेले अर्ज हे अर्जाचे अंतिम दिनांक ०६/०९/२०१४ पर्यत सांयकाळी ५.४५ वा.पर्यत प्राप्त झालेलेच फक्त स्विकारले जातील. मुदतीनंतर कोणत्याही मार्गाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.व या बाबत उमेदवारांस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१४. **पात्र उमेदवारांनी त्यांची लेखी परिक्षा प्रवेशपत्रे ही उमेदवारांनी दिलेल्या पत्त्यावर पोष्टाव्दारे पाठविण्यात येतील. त्यासाठी उमेदवारांने स्वतःचे संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद असलेले व रु. ५/- चे पोष्टाचे तिकीट लावलेले पाकीट अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारांना लेखी परिक्षेची प्रवेशपत्रे प्राप्त न झाल्यास, संबंधित सदस्य सचिव यांचे कार्यालयातून परिक्षेच्या आदल्या दिवशी समक्ष घेवुन जाणेची कार्यवाही करावी. लेखी परिक्षा प्रवेशपत्राशिवाय लेखी परिक्षेस बसणेची संधी उमेदवारांना उपलब्ध करुन दिली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

१५. समांतर आरक्षणातील उमेदवारांनी त्यांचेकडील प्रमाणपत्राच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडण्याची आहेत अन्यथा अर्ज अपात्र समजण्यात येईल. सदर प्रमाणपत्र संबंधित कार्यालयाकडून पडताळणी नंतरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

१६. अंशकालिन बाबतीत शासकीय अथवा निमशासकीय सेवेत अंशकालीन म्हणून ३ वर्षे पुर्ण काम केलेले व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद असलेले अंशकालीन उमेदवार पात्र ठरतील. तसेच अशा उमेदवारांनी अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जा सोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**१७.** अपंग आरक्षणातुन लाभ घेणा-या उमेदवारांनी किमान ४० टक्के अपंग असल्याबाबत मा.जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा शासनाकडील तज्ञ वैद्यकीय मंडळाने दिलेली वैद्यकिय प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. तसेच अपंग आरक्षणातुन निवड केलेल्या उमेदवारांना शासनाने नियुक्ती केलेल्या तज्ञ वैद्यकिय मंडळाने तो उमेदवांर निवड केलेल्या पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यावरच नियुक्ती आदेश देण्यात येईल. यासंबंधी केंद्र शासनाकडील शासन निर्णयातील अपंगाचे निकषानुसार उमेदवारांना अर्ज करावा. **सदरचा शासन निर्णय जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्ळावर उपलब्ध केला आहे**

१८. अपंग उमेदवारांच्या लेखी परीक्षस लेखनिक घेणार किंवा उमेदवारा स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार आहे यांचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

१९. शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी २००९ नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्ग यांमधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामधील महिला उमेदवारांनी सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता उर्वरित प्रवर्गातून खेळाडू समांतर आरक्षणामधुन करणेत येणा-या पदासाठी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर

प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (इएसबीसी) व विशेषमागासप्रवर्ग -अ (एसबीसी-ए) या प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवारांना शासनाचे अनुक्रमे १५/७/२०१४ व १९/७/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२०. शासन परिपत्रक क्रमाक पीआरई २००४/३८५५/प्राशि.१.१ दि.२ जून २००५ नुसार माजी सैनिक या संमातर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवुन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूबातील फक्त जवान किंवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देण्याचे धोरण आहे. त्यांनतर त्यांची अविवाहीत मुलगी/मुलगा यांचा समावेश आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणामधून विचार करण्यात येईल.

२१. विधानसभा निवडणूक आचारसंहितेबाबत निश्चित कालावधी नसलेने परिक्षेच्या वेळापत्रकात बदल झालेस याबाबत जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्ड, संकेतस्थळ व स्थानिक वृत्तपत्रामध्ये सूचना प्रसिध्द करणेत येतील. याबाबत उमेदवारांस वैयक्तिकरित्या कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनांकास लेखी परीक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्याप्रमाणे सोईच्या दिवशी लेखी परीक्षा घेणेत येईल. याबाबत सर्व उमेदवारांना वर्तमान पत्रातून जाहिरातीद्वारे कळविणेत येईल.

२२. एखादया अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल.

२३. लेखी परिक्षेतुन मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यांदी जिल्हा परिषदेच्या नोटीस बोर्डावर व सातारा जिल्हा परिषदेच्या **www.zpsatara.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.

२४. शासन निर्णय क्र. अनियो-१००५/१२६/सेवा-४ दिनांक-३१ ऑक्टोंबर २००५ नुसार निवड झालेल्या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

२५. जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतीम राहील.

२६. जाहिरातीमधील काही बाबी विषयी शंका असल्यास त्यांनी सदस्य सचिव, तथा संबंधीत खातेप्रमुख जि.प.सातारा यांना कार्यालयीन दिवशी व वेळेत समक्ष भेटावे.

२७. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्रक्र.४६/०७/१३-अ दिनांक-२७.०६.२००८ नुसार उमेदवारांनी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

२८. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिति / अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२९. ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.एपीटी-२००६/प्र.क्र.९४/आस्था-८, दिनांक ८ जून २००६ नुसार परिचर पदे भरणेसाठी जि.प.स्तरीय निवड समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा हे राहतील. उर्वरित सर्व पदांसाठी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दिनांक १९/१०/२००७ नुसार जिल्हास्तरीय निवड समिती अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी सातारा हे राहतील.

३०. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील ४ मधील तरतुदीनुसार कुटुंबात दिनांक-२८.३.२००६ नंतर जन्मलेले दोन पेक्षा जास्त अपत्य नाहीत याबाबतचा नमुना- अ मधील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

## नमुना अ

मी श्री./श्रीमती/कुमारी------------------------------------------श्री.----------------------------------------यांचा /यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय------ वर्ष राहणार----------- या व्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करते / करतो की,

१) मी -----------या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ----- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्या पैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर आलेल्या मुलांची संख्या ----- आहे. (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यात पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक :-** /४/२०१३

**अर्जदाराची सही**
अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

**स्वाक्षरीत/-**
**सदस्य,जिल्हा निवड समिती**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

**स्वाक्षरीत/-**
**अध्यक्ष,जिल्हा जिल्हास्तरीय निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी सातारा.**

| साक्षांकित केलेला आयडेंडी साईज फोटो |
|---|

**(अर्जाचा नमुना)**

प्रति,

**मा.सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती सातारा**
**तथा ----------------------------------------------------------**
**विभागाचे नांव --------------------------------------------**
**जिल्हा परिषद सातारा**

**भरती पदाचे नांव :- --------------------------------**

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव (नांव प्रथम) :- -----------------------------------------------------------------

२) उमेदवाराचे नावात बदल असलेस (नांव प्रथम) :- -------------------------------------------------------
( सोबत कागदोपत्री पुरावा आवश्यक )

३) अर्जदार स्त्री आहे की पुरुष. **स्त्री / पुरुष** **विवाहित / अविवाहित**
(लागू नसेल ते खोडावे)

४) पत्रव्यवहाराचा पत्ता :- -------------------------------------------------------------------

४ अ) दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :- दू.क्र.--------------------------- / मोबाईल ---------------

५) जात :- ---------------------------- पोटजात :- --------------------

५ अ) जातीचा प्रवर्ग

(योग्य ठिकाणी √ अशी खुण करावी)

| अनु जाती | अनु जमाती | विजा (अ) | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | शै.सा. मा.प्र. (इएसबीसी) | विमाप्र-अ (एसबीसी ए) | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

६) समांतर आरक्षण

आवश्यक त्या ठिकाणी ( √ ) अशी खुण करावी.

| महिला ३० % | माजी सैनिक १५ % | अशंकालीन १० % | अपंग ३ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भूकंपग्रस्त २ % | खेळाडू ५ % | समांतर आरक्षणा शिवाय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

७) अर्जदाराची जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) तारीख ------- महिना------- वर्ष ------

८) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दिनांक ६/९/२०१४ रोजीचे असणारे वय
वर्ष ------ महिना ----- दिवस -----

९) विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग, इतरमागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील महिला व खेळाडू उमंदवारांनी /खेळाडू यांनी उन्नत व प्रगत गटात गटात मोडत नसलेबाबत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्र जोडावे. (पर्यवेक्षिका/आरोग्य सेवक महिला पद वगळुन उर्वरित पदांसाठी) **होय/नाही**

१०) महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी आहात काय? (डोमासाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक) **होय/नाही**

११) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल) -

| शैक्षणिक पात्रता | परीक्षा मंडळाचे नांव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | एकूण गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२) पुर्वानुभव असल्यास -

| अक्र | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१३) परिक्षा शुल्क फी :- मागासवर्गीय :- होय /नाही
अ) धनाकर्ष (डी.डी.) क्रमांक --------------------------- व दिनांक - --------------------
रक्कम रुपये -----------------

१४) अर्जासोबत जोडलेली प्रमाणपत्रे –

मी श्री.----------------------------------- प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करता/करते की, अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अगर चुकिची आढळून आलेस अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कारवाईस पात्र व बांधील राहीन.

स्थळ -

दिनांक - /०८/२०१४ **अर्जदाराची स्वाक्षरी**

(अर्जदाराचे नाव-----------------------)

**टिप** - अर्जासोबत सर्व प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडाव्यात.

**-o-o-o-o-o-o-o-**

# सातारा जिल्हा परिषद सातारा

| जिल्हा परिषद सातारा | **प्रवेशपत्र -२०१४**<br>**अहस्तांतरणीय** |
|---|---|
| उमदेवराचे नाव<br>पदाचे नाव<br><br>उमेदवराची सही<br><br>खाली बाबी कार्यालयाने भरावयाच्या असल्याने उमेदवारांनी भरु नयेत.<br><br>बैठक क्रमांक<br><br>परिक्षा दिनांक व वेळ / /२०१४ सकाळी/दुपारी<br><br>परिक्षा केंद्र -------------------------------------------------<br>------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------ | या ठिकाणी उमेदवराने अलिकडील काळातील आयडेंटी साईज फोटे लावावा व तो राजपत्रीत अधिकारी यांचेकडून साक्षांकित करावा<br><br>**सही व शिक्का**<br>**सदस्य सचिव तथा विभाग प्रमुख**<br>**जिल्हा निवड समिती सातारा** |

**महात्वाच्या सुचना**

१.उमेदवारांने ओळखपत्रावर विहीत केलेल्या ठिकाणी स्वाक्षरी करुन उजव्या बाजूस स्वतःचा अलिकडच्या काळातील आयडेंटी साईजचा फोटो चिकटून तो राजपत्रीत अधिकारी यांचेकडून सांक्षाकित करावा.

२. परिक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरु होणेपूर्वी एक तास अगोदर उपस्थित रहाणे आवश्यक . उशिरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवरांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवाराने स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ. सोबत आणणेचे आहे.

३.**काळया रंगाचा बॉलपेन** लेखन पॅड इ. परिक्षा साहीत्यच परिक्षा केंद्रावर आणणेचे आहे. पेन्सिलने सोडविलेली उत्तरपत्रिका ग्राहय धरली जाणार नाही.

४. परिक्षा कक्षात उमेदवाराने लेखनसामुग्रीशिवाय वहया कागदपत्र, इतर वस्तू व मोबाईल आदी उपकरणे तसेच गणितीय उपकरणे व इलेक्ट्रानिक्स उपकरणे वापरणेस मनाई आहे. जेणे करुन त्याचा वापर परिक्षेमध्ये नक्कल अथवा परिक्षेमध्ये गैरवापर होण्यास मदत होइल अशा सर्व वस्तू आणता कामा नयेत. तसे आढळल्यास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

५. परिक्षेत कुठल्याही प्रकराची नक्कल या अनुचित प्रकार चालणार नाही. किंवा परिक्षा नियमभंग केल्यास सदर उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही. व त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणेत येईल उमेदवारांना परिक्षेस बसवून घेण्याचा किंवा न घेण्याचा सर्वस्वी अधिकार हे परिक्षा केंद्र प्रमुखांकडे राहतील.

६. परिक्षा वेळ संपले खेरीज कोणत्याही उमेदवाराने परिक्षा कक्ष सोडता कामा नये अन्यथा उत्तरपत्रिका रदद समजणेत येईल.

७. लेखी परिक्षेमध्ये गुणवत्तेनुसार मूलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवाराची निवड यादी जिल्हा परिषद सातारा येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच सातारा जिल्हा परिषदेच्या **www.zpsatara.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखती करीता पात्र ठरलेल्या उमदवारांनी मुलाखती करीता हजर रहाणे याबाबत वेगळयाने कळविले जाणार नाही. मात्र निवड यादीवर कोणत्या तारखेस व कोठे मुलाखतीस हजर रहाणे या बाबत सूचना प्रसिध्द करणेत येतील. मुलाखतीसाठी दिलेल्या वेळेच्या एक तास अगोदर उपस्थित रहाणेचे आहे.

८. परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता तथा दैनिक भत्ता देण्यात येणार नाही.